महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

फोन नं. ०२२-६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला,
शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई ५१

क्रमांक :- ३/विकामुं/लेखा/प्र.ले.व भां.प.आ./२०२५/ दिनांक :-

प्रति,
कुलसचिव / प्राचार्य,
रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई
ॲकॅडमी ऑफ आर्किटेक्चर, प्रभादेवी, मुंबई

विषय :- प्रलंबित लेखा आक्षेप व भांडार आक्षेप यांची सद्यस्थिती सादर करणेबाबत.
संदर्भ :- १) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र
क्र. १४/प्र.ले.व भां.आ.सद्यस्थिती/२०२५/०२, दि.०७-०१-२०२५.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. ३/विकामुं/लेखा/प्र.ले.व भां.प.आ./२०२५/८०३२९९,
दि.१६-०१-२०२५.
३) या कार्यालयाचा दि.२२-०१-२०२५ रोजीचा ई-मेल.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय पत्रान्वये संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय / अनुदानित संस्थांचे प्रलंबित लेखा आक्षेप व भांडार आक्षेप यांचा दि.३१-१२-२०२४ पर्यंतच्या सद्यस्थितीचा अहवाल लेखा आक्षेप व भांडार आक्षेप यांच्या यादीसह दि.१४-०१-२०२५ पर्यंत संचालनालयास सादर करण्याबाबत कळविले होते. या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ च्या पत्रान्वये सदरची माहिती तात्काळ देण्याबाबत कळविले होते. परंतु. माहिती प्राप्त न झाल्यामुळे संदर्भ क्र.३ अन्वये ई-मेल पाठविला. परंतु, अद्यापही आपल्या संस्थांची माहिती अप्राप्त आहे.

रसायन तंत्रज्ञान संस्था, माटुंगा, मुंबई या संस्थेस संदर्भ क्र.२ व ३ अन्वये कळवून तसेच वारंवार दूरध्वनीवरुन संपर्क साधूनही माहिती सादर केलेली नाही.

तरी लेखा आक्षेप व भांडार आक्षेप यांचा दि.३१-१२-२०२४ पर्यंतच्या सद्यस्थितीचा अहवाल लेखा आक्षेप व भांडार आक्षेप यांच्या यादीसह उपरोक्त संदर्भिय पत्रांमध्ये दिलेल्या विवरणपत्रात भरुन हे पत्र प्राप्त होताच विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

Signed by
Pramod A Naik
Date: 06-02-2025 11:28:33

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत :- मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर.